# प्रेस नोट दि.०४/१०/२०१७

**समर्थ पोलीस ठाणेकडुन घरफोडी करण्या-या नोकरास अटक व ६,३७,०००/- रु. जप्त**

समर्थ पोलीस स्टेशन गु.र.नं.१८४/२०१७ भा.द.वि.कलम – ४५४, ४५७, ३८०,३४ मधील फिर्यादी आबेदीन मोहंमद राजकोटवाला, वय-४१ वर्षे, व्यवसाय-व्यापार, राहणार - १२८/०८, मिरा सोसायटी, सॅलिसबरी पार्क, पुणे-३७. यांचे क्वार्टर गेट चौक येथील बॉम्बे रेक्झीन नावाचे दुकानाचे कॉऊंटरमधील एकून ६,७५,०००/- रोख रक्कम घरफोडी करुन चोरून नेली होती. त्याप्रमाणे गुन्हा नोंद करण्यात आला होता.

दाखल गुन्हंयाचा तपास करीत असताना, घटनास्थळाचा बारकाईने तपास करता, गुन्हयातील आरोपी हा माहितगार असावा. अशी खात्री झाल्याने सदर दुकानातील सर्व कामगारांचे मोबाईल नंबरचे सी.डी.आर. विश्लेषण केले असता, सदर दुकानातील कामगार अमीन अकबर मौलवी, वय - २३ वर्षे, राहणार- गल्ली नं. १३, सय्यदनगर, हडपसर, पुणे. हा अपराध घडल्याचे पहाटे तेथे कोणतेही कारण नसताना आला असल्याचे निर्दशनास आल्यानंतर त्यास ताब्यात घेऊन सखोल चौकशी केली असता, त्याने त्याचा आतेभाऊ नामे- शोएब हारुन शेख, वय- २५ वर्षे, राहणार- ३४३, घोरपडे पेठ, पुणे. याच्या मदतीने बनावट चावी तयार करुन सदर घरफोडी चोरी केल्याचे कबुल केले आहे. **गुन्हयात चोरीस गेलेल्या रकमेपैकी ६,३७,०००/- रु. आरोपींकडुन जप्त करण्यात आलेली आहे.** सदर आरोपींची प्रथमवर्ग न्यायदंडाधिकारी, शिवाजी नगर न्यायालय क्र.१ यांचे न्यायालयातुन दि. ०६/१०/२०१७ रोजी पर्यंत पोलीस कस्टडी रिमांड घेण्यात आलेली आहे.

सदरची कामगिरी मा.श्री. रविंद्र सेनगावकर, अप्पर पोलीस आयुक्त द.प्रा.वि., श्री. प्रविण मुंढे, पोलीस उप-आयुक्त परि-२, श्री.निलेश मोरे सहा.पो.आयुक्त लष्कर विभाग यांचे मार्गदर्शनाखाली श्री. राजेंद्र मोहिते वरिष्ठ पोलीस निरिक्षक समर्थ पो.स्टे, श्री. सतिश चव्हाण पोलीस निरीक्षक (गुन्हे), पोलीस उप-निरीक्षक नितीन अतकरे, पोलीस कर्मचारी सुशिल लोणकर, गणेश कोळी, बाळासाहेब भांगले, संतोष काळे, मंगेश नानापुरे, अनिल शिंदे, साहिल शेख, नवनाथ भोसले, सचिन शेजाळ, निलेश साबळे, यांनी केली आहे.